महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २० फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### राज्यसभा निवडणूक : संख्याबळ, शिस्त आणि लोकशाहीची कसोटी

देशातील दहा राज्यांमधील राज्यसभेच्या रिक्त जागांसाठी जाहीर झालेला निवडणूक कार्यक्रम हा केवळ एक घटनात्मक टप्पा नसून, तो सध्याच्या राष्ट्रीय राजकारणातील शक्तिसमीकरणे तपासणारा महत्त्वाचा क्षण ठरणार आहे. निवडणूक आयोग यांनी जाहीर केलेल्या कार्यक्रमामुळे केंद्रातील सत्ताधारी आघाडी आणि विरोधक दोघांसाठीही ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे. राज्यसभा ही संसदेची स्थिरता राखणारी आणि विधेयकांवर सखोल चर्चा करणारी सभा मानली जाते. त्यामुळे येथे निवडले जाणारे सदस्य हे केवळ पक्षांचे प्रतिनिधी न राहता, धोरणात्मक दिशादर्शक ठरतात. सध्या ज्या जागांसाठी निवडणूक होत आहे, त्यामध्ये विरोधी पक्षांच्या तुलनेत सत्ताधारी आघाडीचे संख्याबळ कमी असले, तरी प्रत्यक्ष निकालावर विधानसभेतील अंकगणित, पक्षीय शिस्त आणि अंतर्गत राजकारण यांचा मोठा प्रभाव राहणार आहे. विशेषतः महाराष्ट्रातील निवडणूक अधिक लक्षवेधी आहे. विधानसभेतील बदललेली राजकीय स्थिती, पक्षांतर्गत फूट आणि नव्या आघाड्यांची रचना यामुळे राज्यसभा निवडणूक ही अप्रत्यक्ष का होईना, पण जनमताची चाचणी ठरण्याची शक्यता आहे. क्रॉस व्होटिंग, अपक्षांची भूमिका आणि पक्षादेशाचे पालन या मुद्द्यांवरून लोकशाहीतील नैतिकतेचीही कसोटी लागणार आहे. एकीकडे सत्ताधारी पक्ष आपले संख्याबळ कायम राखण्याचा प्रयत्न करतील, तर दुसरीकडे विरोधक आपली ताकद अबाधित असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे ही निवडणूक केवळ जागांच्या संख्येपुरती मर्यादित न राहता, आगामी राजकीय घडामोडींची दिशा ठरवणारी ठरणार आहे. अशा वेळी निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता, आमदारांची जबाबदारी आणि लोकशाही मूल्यांचे पालन यावरच या निवडणुकीचे खरे यश अवलंबून राहील. राज्यसभा निवडणूक ही सत्तासंघर्षापेक्षा लोकशाही परिपक्वतेचे प्रतिबिंब ठरावी, हीच अपेक्षा. एकूणच, राज्यसभा निवडणूक ही केवळ अंकगणिताची लढाई न ठरता, भारतीय लोकशाहीतील मूल्ये, पक्षीय शिस्त आणि राजकीय परिपक्वतेची खरी परीक्षा ठरणार आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे

### राज ठाकरे-एकनाथ शिंदे भेटीवर नरेश म्हस्के सकारात्मक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १८

ठाण्यातील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शासकीय निवासस्थान 'नंदनवन' येथे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भेट दिली. या भेटीनंतर संभाव्य राजकीय समीकरणांबाबत चर्चा सुरू झाली असतानाच, शिंदे गटाचे प्रवक्ते व आमदार नरेश म्हस्के यांनी या भेटीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात असल्याची प्रतिक्रिया दिली. ही भेट सौजन्यपूर्ण असून वारसा वास्तू व शहर सौंदर्यविषयक चर्चेवर केंद्रित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले यासंदर्भात नरेश म्हस्के यांनी असेही स्पष्ट केले की, कोणतीही राजकीय घोषणा किंवा औपचारिक चर्चा या भेटीत झालेली नाही. मात्र, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातील संवाद नेहमीच सकारात्मक राहिला असून, भविष्यातील राजकीय परिस्थिती पाहता विविध शक्यता चर्चेत येणे स्वाभाविक आहे. सध्या तरी या भेटीकडे राजकीय युतीच्या दृष्टीने निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

### आजपासून दहावी बोर्ड परीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यात उद्यापासून दहावी बोर्ड परीक्षेला सुरुवात होत असून यंदा कॉपीमुक्त अभियान अधिक कडक राबवले जाणार आहे. परीक्षा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्यामार्फत २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी दिली. यंदा राज्यभरातून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी परीक्षेला बसणार असून २३ हजार ६८३ शाळा आणि ५ हजार १११ परीक्षा केंद्रांवर परीक्षा होईल. पारदर्शकतेसाठी २७१ भरारी पथके, जिल्हास्तरीय दक्षता समित्या, परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर बंद, तसेच अनेक केंद्रांवर सीसीटीव्ही व्यवस्था लागू करण्यात आली आहे. गैरप्रकार करणाऱ्यांवर महाराष्ट्र गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा, १९८२ अंतर्गत कडक, दखलपात्र व अजामीनपात्र कारवाई होणार असल्याने विद्यार्थ्यांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त राज्यभर उत्साह ■ शिवनेरीवर रंगला मुख्य सोहळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त राज्यभर मोठ्या उत्साहात कार्यक्रम झाले. पहाटेपासूनच किल्ले शिवनेरी येथे शिवभक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. ढोल-ताशांच्या गजरात आणि "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी शिवनेरी परिसर दुमदुमून गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत किल्ले शिवनेरीवर पाळणा जोजावत शिवजन्मोत्सव साजरा करण्यात आला. शिवाई देवी मंदिरात शिवाई देवी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा अभिषेक व पूजा विधी पार पडला. जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. दरम्यान, राज्यातील विविध भागांत शिवजयंतीनिमित्त मिरवणुका, अभिवादन कार्यक्रम आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिवजयंतीच्या निमित्ताने राज्यभर भक्तीमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले.

## 'माझ्यामुळे अजित दादांना बारामतीला जायला उशिरा झाला हे सांगणं दुर्दैवी' - प्रफुल्ल पटेल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**मुंबई : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेवर रोहित पवार यांनी शंका उपस्थित केल्यानंतर आता या प्रकरणावर प्रफुल्ल पटेल यांनी प्रथमच आपली भूमिका मांडली आहे. अपघाताबाबत उगीच अपप्रचार केला जात असून, तपासासाठी स्वतंत्र यंत्रणांना आधीच अधिकार देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



रोहित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदांमध्ये, अपघाताच्या दिवशी पूर्व विदर्भातील एका बड्या नेत्याचा फोन आल्यामुळे अजित पवार यांना उशीर झाला आणि त्यामुळे त्यांचा रस्ते मार्गे प्रवास रद्द झाल्याचा दावा करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर प्रतिक्रिया देताना प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले की, अपघाताच्या दिवशीच केंद्रीय विमान वाहतूक मंत्र्यांनी बारामती येथे येऊन एअर क्राफ्ट एक्सिडेंट इनव्हेस्टिगेशन ब्युरो (AAIB) या स्वायत्त संस्थेला तपासाचे निर्देश दिले होते. त्यानंतर काही दिवसांतच महाराष्ट्र सरकारकडून सीआयडी चौकशी जाहीर करण्यात आली. शिवाय, सीबीआय तपासाचीही मागणी करण्यात आली असून, त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणा आपापले काम स्वतंत्रपणे करत आहेत. फोनबाबत सुरू असलेल्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना प्रफुल्ल पटेल म्हणाले की, त्यांनी दिल्लीहून अजित पवार यांना फोन केला होता; मात्र ते कोणत्या शहरात आहेत, याची माहिती त्यांना नव्हती. पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांच्या धान खरेदीचे पैसे प्रलंबित असल्याचा मुद्दा लक्षात आणून देण्यासाठीच हा फोन केला होता. सामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी उपमुख्यमंत्र्यांशी संपर्क साधणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. राईस मिल किंवा कोणत्याही फाईलसाठी फोन केल्याचा दावा चुकीचा असल्याचे सांगत, माझ्यामुळे अजित पवार यांना उशीर झाला, असा प्रचार करणे अतिशय दुर्दैवी असल्याची खंत प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केली. या अपघातामुळे महाराष्ट्रासह देशाला मोठा धक्का बसला असून, अशा संवेदनशील घटनेवर चुकीचा प्रचार करणे खेदजनक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## काकोळेगाव पुलाच्या कामाला वेग द्या

### आमदार सुलभा गायकवाड यांचे निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९



काकोळेगाव येथील नवीन पुलाच्या बांधकामाचा प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन आढावा घेत कामाला गती देण्याचे स्पष्ट निर्देश आमदार सुलभा गायकवाड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. म.औ.वि. महामंडळामार्फत बारवी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत खोणी ते फॉरेस्ट नाका बी.जी. मेन पाईपलाईन सर्व्हिस रोडचे काँक्रीटीकरण तसेच काकोळेगावाजवळील नवीन पुलाच्या बांधकामास कार्यादेश देण्यात आला असून काम सध्या प्रगतीपथावर आहे.

काकोळेगावातील जुना व जीर्ण झालेला पूल निष्कासित करून त्या ठिकाणी सुरक्षित व भक्कम नवीन पुलाचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. वाहतुकीची सुरक्षितता राखणे आणि भविष्यातील अपघात टाळण्याच्या दृष्टीने हे काम अत्यंत महत्त्वाचे असून हे बांधकाम मे २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

बांधकामादरम्यान ग्रामस्थांच्या दैनंदिन ये-जा करण्यासाठी हॉटेल अप्रतिमच्या बाजूने तात्पुरता पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यात आला आहे. कामाचा सविस्तर आढावा घेताना आमदार गायकवाड यांनी पुलाचे व रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. कामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या वेळी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळचे उपअभियंता सुधीर कुंभार, औदुंबर अलाट, सहाय्यक अभियंता निलेश भोपळे, गणेश जंगल, गणेश वेताळ, सरपंच सौ. सुरेखा देविदास गायकर, पोलिस पाटील सुर्यकांत पाटील, उपसरपंच नरेश गायकर, माजी सरपंच संतोष गायकर, माजी उपसरपंच आत्माराम बापू गायकर तसेच काकोळेगावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "काकोळेगावातील जुना व जीर्ण पूल हटवून सुरक्षित व भक्कम नवीन पुलाचे बांधकाम करण्यात येत आहे. ग्रामस्थांच्या वाहतुकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. पुलासह रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. कामात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही."
>
> ● आमदार सुलभा गायकवाड

## भिवंडी महापौर पदासाठी आज निवडणूक

### भाजपच्या 'व्हीप'मुळे बंडखोरांचे नगरसेवकपद धोक्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९

**मुंबई :** भिवंडी महापालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत बंडाचे निशाण फडकावणाऱ्या नगरसेवकांना धडा शिकवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने वेगवान हालचाली सुरू केल्या आहेत. बंडखोर नारायण चौधरी यांच्या नेतृत्वाखालील गटाने काँग्रेसप्रणित 'सेक्युलर फ्रंट'ला पाठिंबा देण्याची घोषणा केली असली, तरी भाजपच्या 'व्हीप'मुळे या बंडखोरांचे नगरसेवकपद धोक्यात आले आहे. पक्षादेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर पक्षांतर बंदी कायद्यानुसार तातडीने कारवाईचे संकेत भाजपने दिले आहेत.

शुक्रवार, दि. २० रोजी भिवंडीच्या महापौरपदासाठी मतदान होत असून भाजपने स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. याला विरोध करत नारायण चौधरी यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपच्या २२ नगरसेवकांपैकी १३ नगरसेवक आपल्या पाठीशी असल्याचा दावा त्यांनी केला असला, तरी काँग्रेसशी हातमिळवणी करून स्वपक्षाच्या उमेदवाराविरोधात भूमिका घेतल्याने भाजप नेतृत्व आक्रमक झाले आहे. पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने स्पष्ट केले की, पक्षाने दिलेल्या अधिकृत उमेदवारालाच मतदान करणे सर्व नगरसेवकांवर बंधनकारक आहे. जो कोणी या आदेशाचे उल्लंघन करेल, त्याचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे तत्काळ दाद मागितली जाईल.

भिवंडी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सर्वाधिक ३० नगरसेवक विजयी झाले असून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या १२ नगरसेवकांचा त्यांना पाठिंबा आहे. बहुमतासाठी आणखी ४ नगरसेवकांची आवश्यकता असताना नारायण चौधरी यांच्या बंडखोरीमुळे काँग्रेसने 'सेक्युलर फ्रंट'अंतर्गत त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. मात्र तांत्रिकदृष्ट्या हे नगरसेवक अद्याप भाजपचेच असल्याने, त्यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात मतदान केले किंवा गैरहजर राहिले तर त्यांचे नगरसेवकपद जाणे निश्चित मानले जात आहे. परिणामी काँग्रेसच्या सत्तास्थापनेचा दावा कायदेशीर अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

नारायण चौधरी यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार कायम आहे. पक्षांतर बंदी कायद्यानुसार मूळ पक्षाच्या दोन-तृतीयांश सदस्यांनी वेगळी वाट निवडल्यासच संरक्षण मिळते. मात्र भिवंडीतील भाजपच्या २२ सदस्यसंख्येच्या तुलनेत बंडखोरांकडे आवश्यक संख्याबळ नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पाठिंब्यावर उभे राहिलेले हे नगरसेवक आणि त्यांचे राजकीय भविष्य अंधारात जाण्याची चिन्हे दिसत आहेत.




## निधी नाही तर टेंडर का काढता ?

### ठाणे मंडळातील कंत्राटदारांची 2,114 कोटींची थकबाकी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. १९



**ठाणे :** सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत ठाणे मंडळातील कंत्राटदारांची सुमारे २,११४ कोटी रुपयांची थकबाकी प्रलंबित असताना प्रत्यक्षात केवळ ४३७ कोटी रुपयांचीच तरतूद करण्यात आल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ यांच्याकडून करण्यात आला आहे. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही देयके अदा केली जात नसल्याने कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे.

महासंघाचे ठाणे विभागाध्यक्ष मंगेश आवळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना "निधीच नसेल तर टेंडर काढता कशाला?" असा थेट सवाल उपस्थित केला. त्यांच्या मते, ठाणे मंडळात निवासी इमारतींसाठी ७१ कोटी, कार्यालयीन इमारतींसाठी १३६ कोटी, राज्यमार्ग रस्त्यांसाठी ३१६ कोटी, राज्यमार्ग पुलांसाठी १० कोटी, प्रतिमा रस्त्यांसाठी ८३० कोटी, प्रजिमा पुलांसाठी ८३ कोटी, आदिवासी भागातील रस्ते व पुलांसाठी ६०० कोटी, तसेच विविध योजनांतील रस्ते व पुलांसाठी ६८ कोटी रुपयांची थकबाकी असून एकूण रक्कम २,११४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून ही देणी रखडली असल्याचे त्यांनी सांगितले.

शासनाकडून प्राप्त होणारा निधी पाच दिवसांच्या आत संबंधित कंत्राटदारांच्या खात्यात जमा करण्यात यावा, अशी ठाम मागणी महासंघाने केली आहे. निधी मिळाल्यानंतर काही निवडक इन्फ्रा कंपन्यांना तत्काळ देयके अदा केली जातात, तर सामान्य कंत्राटदारांना दोन-दोन महिने वेठीस धरले जाते, असा आरोपही यावेळी करण्यात आला.

**■ पारदर्शकतेचा ■ अभाव**

कंत्राटदारांना किती निधी मिळणार, केव्हा मिळणार याबाबत कोणतीही पारदर्शक माहिती दिली जात नसल्याची तक्रार महासंघाने केली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.



# कुळगांव-बदलापूरमध्ये शिवजयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : दि. १९/०२/२०२६ रोजी कुळगांव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मा. नगराध्यक्षा सौ. रुचिता घोरपडे मॅडम तसेच मुख्याधिकारी श्री. मारुती गायकवाड साहेब यांनी कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यालयातील प्रतिमेस, छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि उल्हास नदी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




याचप्रसंगी कुळगांव बदलापूर शहरातील पत्रकार बंधूंनी आयोजित केलेल्या पुस्तक प्रदर्शनाला मान्यवरांनी भेट दिली. तसेच बदलापूर शहर पत्रकार संघ यांच्या वतीने कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. मारुती गायकवाड यांना "कार्यक्षम प्रशासक" सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. हा सन्मान मुरबाड विधानसभेचे आमदार श्री. किसन कथोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सदर कार्यक्रमास नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवजयंती उत्साहात साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत आज शिवजयंती मोठया उत्साहात साजरी झाली. महापालिका मुख्यालयात राज्यगीत गायनानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापालिका महापौर हर्षाली विजय चौधरी यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अति. आयुक्त हर्षल गायकवाड, अति. शहर अभियंता (विदयुत/यांत्रिकी) प्रशांत भागवत, महापालिका सचिव किशोर शेळके, उपायुक्त कांचन गायकवाड, मुख्य उदयान अधिक्षक संजय जाधव, शिक्षणाधिकारी विजय सरकटे, सहा.आयुक्त धनंजय थोरात, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग आणि नागरिक उपस्थित होते.





कल्याण पश्चिम छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास महापौर हर्षाली विजय चौधरी, महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. डोंबिवलीतही राज्यगीताचे गायन करुन महापालिकेच्या जुन्या विभागीय कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास आणि मानपाडा रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास उपमहापौर राहुल दामले यांनी पुष्पहार अभिवादन केले. या समयी उपस्थित उपायुक्त बाळासाहेब चव्हाण, रामदास कोकरे, कार्यकारी अभियंता शैलेश मळेकर, सहा. आयुक्त प्रसाद ठाकूर, भारत पवार, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

या समयी महापालिकेच्या बारावे येथील शाळा क्र.68, धाकटे शहाड येथील शाळा क्र.33 व उंबर्डे येथील शाळा क्र.12 मधील चिमुकल्या विदयार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रमांचे अतिशय बहारदार सादरीकरण करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# उल्हासनगर महानगरपालिकेत शिवरायांना अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिकेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी महापालिका मुख्यालयात ध्वजारोहण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाला महापालिका आयुक्त, विविध





विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, स्वराज्य स्थापनेची दूरदृष्टी व आदर्श नेतृत्व यावर विचार मांडण्यात आले. महाराजांचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत वक्त्यांनी व्यक्त केले. जयंतीनिमित्त परिसरात स्वच्छता, सजावट व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समारोपप्रसंगी सर्व उपस्थितांनी महाराजांच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला.

# छत्रपती शिवाजी महाराज यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे दि. 29-12-2025 च्या परिपत्रकान्वये आज दि. 19-02-2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर मजल्यावर मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगी, मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे, मा. उप-आयुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, मा. शहर अभियंता श्री. जमिल पटेल, मा. उप-आयुक्त श्रीमती सपना वसावा, मा. अतिरीक्त शहर अभियंता श्री. सचिन नाईक, मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर पाणी पुरवठा विभाग, मा.सहा.आयुक्त आरोग्य श्री फैसल तातली, मा. सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र. 1 श्री मकसुम शेख, मा.सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र. 2 श्री माणिक जाधव, मा.सहा.आयुक्त प्रभाग समिती क्र. 3 श्री. सुरेंद्र भोईर, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेश पवार, मार्केट विभाग प्रमुख श्री स्नेहल पुण्यार्थी, वाहन विभाग प्रमुख श्री, शेखर चौधरी, बी.जे.पी. दवाखाना कार्यालयीन अधीक्षक श्री नितेश चौधरी, पर्यावरण विभाग प्रमुख श्री. सुनिल भोईर, मुख्य आरोग्य निरिक्षक श्री. जे.एम. सोनावणे (पुर्व), मुख्य आरोग्य निरिक्षक श्री. हरेश भंडारे (पश्चिम) व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कु ब न प कार्यालयात छत्रपती शिवरायांना अभिवादन





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

दि. १९/०२/२०२५ रोजी कु ब न प कार्यालयात आयोजित ' छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त कार्यालयात, छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच उल्हास नदी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा या ठिकाणी मा. नगराध्यक्षा श्रीमती रुचिता घोरपडे मॅडम श्री. मारुती गायकवाड , मुख्याधिकारी . यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले या वेळी नागरिक व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# ठाणे महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (19)** : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने आज छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महापालिकेतील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तद्नंतर मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी सर्व ठाणेकरांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.



तसेच कळवा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळयास उपमहापौर कृष्णा पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, शिवसेना गटनेते पवन कदम, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी, दीपक झिंजाड, परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे, सहायक आयुक्त ललिता जाधव, सोपान भाईक, प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# जिजाऊंचा 'शिवबा' ते विश्वाचे 'छत्रपती'

## एका 65 वर्षीय कृतज्ञ शिवभक्ताचे चिंतन

मी आयुष्याची 65 वर्षे पूर्ण करून, अनुभवांच्या गाठीशी बांधलेल्या एका वळणावर उभा आहे. या वयात पोहचल्यावर जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा मला जाणवतं की, आपण 'छत्रपतीं'चा जयजयकार करण्यात आयुष्य घालवलं, पण त्या महापुरुषाला घडवणाऱ्या 'घडणयंत्राचा' (The Crafting Process) विचार करायला आपण थोडं विसरलो.

महाराजांच्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल हे 'अशक्य' होतं, पण ते 'शक्य' झालं कारण त्यांच्या पाठीशी जिजाऊंचे संस्कार आणि गुरूंची दूरदृष्टी होती. चला, यंदाची शिवजयंती या 'घडवणुकीच्या' कृतज्ञतेतून साजरी करूया.

### 1. जिजाऊ : संस्कारांचे विद्यापीठ

पुण्यातील लाल महालात जेव्हा जिजाऊंनी बाल शिवबांना रामायण-महाभारतातील गोष्टी सांगितल्या, तेव्हा त्या केवळ 'गोष्टी' नव्हत्या, तर ते 'केस स्टडीज' (Case Studies) होते. रामाने रावणाचा वध का केला? अन्यायाविरुद्ध उभे राहणे हे पाप का नाही? हे त्यांनी बालमनावर कोरलं.

ऐतिहासिक दाखला: शहाजीराजे कर्नाटकात असताना, जिजाऊंनी पुण्यात राहून ओसाड झालेलं गाव पुन्हा वसवण्यासाठी 'सोन्याचा नांगर' फिरवला. हा केवळ शेतीचा कार्यक्रम नव्हता, तर तो रयतेचा विश्वास संपादन करण्याचा संस्कार होता.

**आजचा धडा** : आज आपण मुलांना महागडे कोचिंग क्लासेस लावतो, पण जिजाऊंसारखा 'संवाद' साधतो का? आई म्हणजे घराचं 'चारित्र्य' असते. जर मुलाला आईकडून प्रामाणिकपणाचे संस्कार मिळाले, तर तो भविष्यात कोणत्याही क्षेत्रात 'राजा'च बनेल.

### 2. गुरूंचे मार्गदर्शन : तलवारीला बुद्धीची जोड

महाराजांच्या आयुष्यात अनेक गुरूंचे योगदान लाभले. दादोजी कोंडदेवांनी त्यांना अश्वारोहण आणि प्रशासकीय शिस्त शिकवली, तर समर्थ रामदास स्वामी आणि संत तुकाराम महाराजांच्या विचारांनी त्यांना 'लोकाभिमुख' केलं.

ऐतिहासिक दाखला: आग्र्याहून सुटका होताना महाराजांनी वापरलेली युक्ती ही केवळ चातुर्य नव्हती, तर ती 'शिस्तबद्ध नियोजनाचा' (Strategic Planning) कळस होता. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाते, तेव्हा संयम कसा राखावा, हे त्यांना गुरूंच्या मार्गदर्शनातून मिळाले.

**वर्तणुकीत बदल** : आपणही आपल्या आयुष्यात एक 'मार्गदर्शक' (Mentor) शोधला पाहिजे. ६५ व्या वर्षी मला जाणवतं की, वय कितीही झालं तरी शिकण्याची वृत्ती आपल्याला तरुण ठेवते.

### 3. निसर्ग आणि गड : स्वराज्याची फुफ्फुसे

छत्रपतींचे निसर्गप्रेम हे केवळ कवितांपुरते नव्हते.

**ऐतिहासिक दाखला** : "गडावर आधी पाणी, मग तटबंदी" हे त्यांचे सूत्र होते. रायगडावर पाण्याचे टाके खोदताना त्यांनी जो दगड काढला, तोच दगड तटबंदीसाठी वापरला. हे आजच्या काळातील 'वेस्ट टू वेल्थ' (Waste to Wealth) चे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी झाडांना 'लेकरांसारखे' मानले.

लेखकः
विजयकुमार कट्टी
(संस्थापक, वेसॅक इंडिया)

**माझी कृतज्ञता** : 'ट्री मॅन ऑफ ठाणे' म्हणून कार्य करताना मला महाराजांच्या याच सूत्राने प्रेरणा दिली. यंदा आपण शिवजयंतीला अशा एका झाडाची जबाबदारी घेऊया, जे आपल्याला सावली देईल. पर्यावरणाची सेवा हीच खरी 'शिवसेवा' आहे.

### 4. वर्तन बदल: 'मी' कडून 'राष्ट्र' कडे

महाराजांनी कधीच स्वतःसाठी महल बांधले नाहीत, त्यांनी गड बांधले. त्यांनी स्वतःचा गादीचा लोभ धरला नाही, त्यांनी 'स्वराज्य' उभं केलं.

**कौटुंबिक समन्वय:** जसे महाराजांनी मावळ्यांमध्ये 'belongingness' निर्माण केली, तशी आपण आपल्या कुटुंबात निर्माण करूया का? आपल्या मुलांशी, नातवंडांशी बसून त्यांच्या समस्या ऐकून घेणं, त्यांना महाराजांच्या गोष्टीतील 'मथितार्थ' सांगणं, हे संवाद सांधण्याचे काम करेल.

**अनोखी दृष्टी (Anomaly)** : आपण सणांना फटाके फोडून हवा प्रदूषित करतो, याउलट महाराजांच्या काळात सण म्हणजे रयतेला एकत्र आणून आनंद वाटणे असायचे. यंदा आपण 'झिरो वेस्ट' (Zero Waste) जयंती साजरी करून पृथ्वीचा सन्मान करूया.

**निष्कर्ष** : जीवनाचा 'राज्याभिषेक'

65 व्या वर्षी मला उमजलंय की, छत्रपती शिवाजी महाराज हे एक 'विचार' आहेत. जिजाऊंच्या संस्कारातून जन्माला आलेला हा विचार जर आपण आपल्या वर्तनात उतरवला, तर प्रत्येक घर एक 'संस्कार केंद्र' बनेल.

**माझा संदेश** : आईचा आदर करा, निसर्गाला आई माना आणि समाजाला आपले कुटुंब समजा. हीच खरी 'समरसता' आणि हीच खरी 'हार्मनी'.

या जयंतीला आपण सर्वांनी मिळून प्रतिज्ञा करूया-"महाराजांनी जे स्वराज्य उभं केलं, ते सुराज्य करणं हीच आमची त्यांना खरी आदरांजली असेल."

जय जिजाऊ! जय शिवराय!

# 'विकसित महाराष्ट्र'साठी पायाभूत संस्थांची ठोस दिशा

## ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन परिषदेत विकासदृष्टी सादर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 19** : परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आयोजित ग्लोबल इकॉनॉमिक को-ऑपरेशन परिषदेत महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पायाभूत व औद्योगिक संस्थांच्या प्रमुखांनी राज्याच्या उद्योगविकास, गुंतवणूक वाढ आणि 'विकसित महाराष्ट्र' या ध्येयपूर्तीसाठी ठोस दिशा मांडली.

मुंबई येथे आयोजित ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन परिषदेत विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (MSRDC) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे (CIDCO) व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळचे (MIDC) सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कुणाल खेमनार आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मुख्य गुंतवणूक व नियोजन अधिकारी (MMRDA) डॉ.शंकर देशपांडे यांनी सहभाग घेत राज्यातील चालू व नियोजित विकास प्रकल्पांची माहिती दिली.

यावेळी उद्योगवृद्धीसाठी आधुनिक पायाभूत सुविधा, वेगवान आणि सुसंगत कनेक्टिव्हिटी, एकल खिडकी प्रणालीद्वारे उद्योग सुलभता आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी करण्यात येणारे सामंजस्य करार हे महत्त्वाचे घटक ठरत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सेंटर क्षेत्रातील संधी, औद्योगिक समूह विकास, लॉजिस्टिक सक्षमता आणि कौशल्य विकास या विषयांवरही परिषदेत सखोल चर्चा झाली.

राज्यात सुरू असलेल्या महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू आणि हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग यांसारख्या उपक्रमांमुळे उद्योगांना सुलभ कनेक्टिव्हिटी मिळून गुंतवणुकीला चालना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच MMRDA, CIDCO, MIDC आणि MSRDC यांच्या माध्यमातून विकसित होत असलेल्या औद्योगिक क्षेत्रांमुळे राज्यातील रोजगारनिर्मिती आणि आर्थिक प्रगतीला गती मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या परिषदेत मांडलेल्या विचारांतून राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय साधून उद्योगांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देण्यावर भर देण्यात आला. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि गुंतवणूक अनुकूल धोरणे यांच्या बळावर महाराष्ट्र उद्योग, नवकल्पना आणि आर्थिक प्रगतीच्या दिशेने अधिक वेगाने वाटचाल करेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

# भविष्यवेध



शुक्रवार

२० फेब्रुवारी २०२६

**मेष**

तुमचे काम पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित कराल आणि तुमचे बहुतेक प्रयत्न यशस्वी होतील. नवीन वाहन खरेदी करण्याबाबत तुम्ही उत्साहित असाल. तुम्हाला वडिलांच्या सेवांचा फायदा होईल आणि त्यांचे आशीर्वाद तुमच्या आयुष्यातील कोणत्याही चालू समस्या सोडवण्यास मदत करतील.व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे स्वप्ने लवकरच पूर्ण होतील. वैवाहिक जीवन आनंदी राहील .

**वृषभ**

**मिथुन**

आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**कर्क**

अध्यात्मात थोडा वेळ घालवाल, मनाला शांती मिळेल. तुम्हाला दीर्घकाळापासून असलेल्या समस्येतून आराम मिळेल.नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्यामुळे आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल.

**सिंह**

लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**

घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**

जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**

आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**धनु**

शारीरिक समस्येपासून मुक्तता मिळेल, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. नवीन टप्पा गाठण्यात यशस्वी व्हाल आणि प्रशंसा केली जाईल. तुमचे कनिष्ठ विद्यार्थी देखील शिकण्याचा प्रयत्न करतील.

**मकर**

सामाजिक कार्यात सहभागी व्हाल, ज्यामुळे तुमची प्रतिमा उंचावेल. अविवाहित लोकांना लग्नाचा प्रस्ताव येऊ शकतो. सरकारी योजनेचा लाभ घेण्यास यशस्वी व्हाल.

**कुंभ**

मालमत्तेत गुंतवणूक करण्याची योजना आखू शकता. व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल.

**मीन**

कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा.


नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे जिल्ह्याच्या विकासासाठी वाढीव निधी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १९**

**ठाणे : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६-२७ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील विविध विकासप्रकल्प मार्गी लावण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ₹ १ हजार ७०० कोटींच्या प्रारूप आराखड्यास मागणीपेक्षा वाढीव निधी देण्यात येईल. ठाणे जिल्ह्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे ठाम आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

राज्यातील विविध जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) प्रारूप आराखड्यांना अंतिम स्वरूप देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच राज्यस्तरीय बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. या बैठकीत ठाणे जिल्ह्याच्या विकासात्मक गरजा, प्राधान्यक्रम आणि निधीवाटप यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या आठवड्यात ठाणे जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली होती. या बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सखोल आढावा घेण्यात आला. मागील वर्षी मंजूर झालेला निधी पडून न राहता विहित वेळेत खर्च व्हावा, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या. तसेच २०२६-२७ साठीचा ₹ १ हजार ७०० कोटींचा प्रारूप आराखडा या बैठकीत मंजूर करून तो राज्यस्तरीय बैठकीत सादर करण्यात आला.

जिल्हा नियोजन समितीने तयार केलेल्या या आराखड्यात ₹ ६६०.३५ कोटींचा मूळ प्रस्ताव समाविष्ट होता. विविध विभाग व यंत्रणांच्या मागण्यांचे सखोल विश्लेषण करून व्यवहार्य ठरणारी ₹ १ हजार ३९.६५ कोटींची अतिरिक्त मागणी प्रस्तावित करण्यात आली. अशा प्रकारे एकूण ₹ १ हजार ७०० कोटींचा आराखडा राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सुरुवातीला ठाणे जिल्ह्यास ₹ ८०५.८४ कोटींची तरतूद कळविण्यात आली होती. त्यानंतर राज्यस्तरीय बैठकीत ₹ १९९ कोटींची वाढ मंजूर करण्यात आली. परिणामी ठाणे जिल्ह्यासाठी ₹ १ हजार ५ कोटींचा अंतिम नियतव्यय मंजूर झाला. २०२४-२५ च्या तुलनेत ही वाढ सुमारे ६७ टक्के इतकी होती. राज्य शासनाच्या सकारात्मक भूमिकेमुळे ठाणे जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, सामाजिक व आर्थिक विकासकामांना गती मिळणार असून, सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा निर्धार शासनाने पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

## भिवंडी महापौर, उपमहापौर निवडणूक चुरशीची होणार

# सर्व पक्षांना घायाळ करण्यासाठी काँग्रेसकडून नारायणास्त्राचा वापर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ भिवंडी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात गाजत असलेल्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीला वेगळे वळण लागल्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांमध्ये उभी फूट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे.महापालिकेत जास्त नगरसेवक निवडून आलेल्या काँग्रेस पक्षाने अचानकपणे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे भाजपचे जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी यांना महापौर पदासाठी उमेदवारी जाहीर करून शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस,समाजवादी आणि भाजपच्या मोठ्या नेत्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.काँग्रेस पक्षाने अचानकपणे नारायण नावाच्या अस्त्राचा वापर केल्याने सध्या सर्व पक्ष घायाळ होऊन चिंताग्रस्त झालेले दिसत आहेत.महापौर खेळी करत असताना महापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेले काँग्रेस पक्षाचे नगरसेवक मोमीन तारिक अब्दुल बारी यांना उपमहापौर पदासाठी उमेदवारी पक्षाने जाहीर केली आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या आदेशानुसार प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष ऍड.गणेश पाटील यांनी जाहीर प्रसिद्धी पत्रामध्ये ही भूमिका जाहीर केली आहे.

देश व महाराष्ट्रामध्ये एकमेकांचे कट्टर राजकीय वैरी ओळखले जाणाऱ्या काँग्रेस व भाजपमध्ये सेक्युलर फ्रंटच्या नावाखाली होणारी हि युती महाराष्ट्रा वेगळा पॅटर्न निर्माण करण्याची चर्चा सुरु झाली आहे.काँग्रेस पक्षाने घेतलेल्या भूमिकेमुळे भिवंडीतील महापौर व उपमहापौर निवडणुकीची सत्ता समीकरणे बदलणार असल्याची चिन्हे दिसत आहे.

बहुचर्चित भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी उद्या शुक्रवार (२०फेब्रु.) रोजी ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक होणार आहे.त्यामुळे भाजप, शिवसेना, काँग्रेस,समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी पक्ष,कोणार्क विकास आघाडी व भिवंडी विकास आघाडी नगरसेवक सत्तास्थापनेसाठी बहुमतांची जुळवाजुळवी करीत आहे.भिवंडी महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस ३०,शिवसेना १२,भाजप २२,राष्ट्रवादी काँग्रेस १२,समाजवादी पक्ष ६,कोणार्क विकास आघाडी ५,भिवंडी विकास आघाडी ३ असे ९० नगरसेवक निवडून आलेले आहेत.महापौर व उपमहापौर पदासाठी काँग्रेस, भाजप,शिवसेना,कोणार्क विकास आघाडी,भिवंडी विकास आघाडी यांच्या मार्फत नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सध्या महापौर पद व सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपचे जेष्ठ नगरसेवक नारायण चौधरी यांनी पक्षादेशानुसार पुढाकार घेतला आहे.असे असताना भाजपच्या काही नगरसेवकांनी वेगळी चूल मांडून पक्षात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे भाजपमध्ये दुफळी निर्माण झाली.हे पाहून शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेने देखील महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीत आपल्या नगरसेवकांना उतरवून महापालिकेत महायुती नसल्याचे चित्र निर्माण केले असे असताना भाजपचे शहराध्यक्ष रविकांत सावंत यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार भाजप महापौर पदासाठी नारायण चौधरी यांची उमेदवारी जाहीर केलेली असताना अचानकपणे बुधवार (१८ फेब्रु.) रोजी स्नेहा मेहुल पाटील यांना महापौर पदासाठी उमेदवार जाहीर करून भाजपच्या सर्व नगरसेवकांना आश्चर्याचा धक्का दिला.त्यामुळे भाजपात पुन्हा एकदा गटबाजी असल्याचे उघड झाले. या घटनेची दखल घेत भाजपचे उमेदवार नारायण चौधरी यांनी नाराजी व्यक्त करीत मला भाजपने अधिकृत उमेदवार जाहीर केलेला असताना भाजपने स्नेहा मेहुल पाटील यांना महापौर पदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले.म्हणून मी सेक्युलर फ्रंट बरोबर जाण्याची माहिती त्यांनी पत्रकारांना दिली. महापौर पदासाठी होत असलेल्या राजकीय घडामोडीमुळे भाजपातील १२ नगरसेवकांचा एक गट चौधरी यांच्यासोबत आहे.त्यामुळे महापौर पदासाठी राजकीय समीकरण बदली होत असताना काल बुधवार रोजी रात्री अचानकपणे ३० काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी चौधरी यांच्याशी सलगी केली.

त्यामुळे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या आदेशावरून प्रदेश वरिष्ठ उपाध्यक्ष ऍड.गणेश पाटील यांनी नारायण चौधरी यांच्यासाठी एक प्रसिद्धीपत्रक जाहीर केले आहे.काँग्रेस गटनेते मोमीन तारीक यांना दिलेल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे कि,काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आदेशानुसार आपणास सूचित करण्यात येते कि,२० फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या भिवंडी महापालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी काँग्रेस पक्षाच्यावतीने महापौर पदासाठी नारायण रतन चौधरी,उपमहापौर पदासाठी मोमीन तारिक अब्दुल बारी हे दोन्ही महापौर व उपमहापौर पदाचे उमेदवार म्हणून निवडून येण्यासाठी आपण काँग्रेस पक्षाच्या महानगरपालिकेतील सर्व सदस्यांना (व्हीप) पक्षादेश द्यावा.तसेच आवश्यक ती कारवाई असे पत्र वरिष्ठ उपाध्यक्ष ऍड.गणेश पाटील यांनी भिवंडी मनपाचे काँग्रेस गटनेता मोमीन तारिक अब्दुल बारी यांना दिले आहे. काँग्रेस पक्षाने अचानकपणे भाजपच्या उमेदवार नगरसेवक नारायण चौधरी यांना उमेदवार जाहीर केल्याने शिवसेना व भाजपाला देखील धक्का बसला आहे. या महापौर पदाच्या निवडणुकीत शिवसेना उमेदवार देखील उतरलेले आहेत. या निवडणुकीच्या निमित्ताने भिवंडीत भाजपा नगरसेवकांमधील दुफळी व काँग्रेस पक्षाने घेतलेल्या निर्णयाने भिवंडीचे राजकारण ढवळून निघाले असून आता शिवसेनेचे पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोणते पाऊल उचलणार आहेत,याकडे भिवंडीकरांचे लक्ष लागले आहे.




# मीरा-भाईंदरमध्ये मालमत्ता करात मोठी वाढ

## नागरिकांवर आर्थिक भार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १९**

**भाईंदर** : मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत १ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या नवीन मालमत्ता कर आकारणी दरांमध्ये सत्ताधारी **भारतीय जनता पक्ष**ने मोठी वाढ केल्याने शहरातील नागरिकांवर आर्थिक भार वाढणार आहे. बुधवारी झालेल्या महासभेत बहुमताने हा ठराव मंजूर करण्यात आला असून निवासी व अनिवासी मालमत्तांच्या करात लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.

यापूर्वी निवासी मालमत्तांसाठी २.४० रुपये प्रति चौरस फूट प्रति महिना, तर अनिवासी मालमत्तांसाठी ४.५० रुपये प्रति चौरस फूट प्रति महिना असा दर लागू होता. नव्या निर्णयानुसार निवासी मालमत्तांसाठी ४ रुपये प्रति चौरस फूट प्रति महिना, तर अनिवासी मालमत्तांसाठी ६ रुपये प्रति चौरस फूट प्रति महिना असा वाढीव दर लागू करण्यात आला आहे. या प्रस्तावाला महापौर डिंपल मेहता यांनी मंजुरी दिली आहे. नव्याने नोंदणी होणाऱ्या मालमत्तांवर १ एप्रिल २०२६ पासून या दरांची अंमलबजावणी होणार आहे.

**■ विरोधकांचा निषेध**

या करवाढीच्या निर्णयास भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शिवसेना यांच्या विकास आघाडीने तीव्र विरोध दर्शविला आहे. विशेष म्हणजे भाजपच्या नगरसेविका निला सोंस यांनीही या करवाढीला विरोध केल्याचे समोर आले आहे. विकास आघाडीचे गटनेते जय ठाकूर यांनी सत्ताधारी भाजपवर टीका करताना सांगितले की, बहुमताच्या जोरावर नागरिकांवर वारंवार करवाढ लादली जात आहे. शहरात अनेक नागरी समस्या प्रलंबित असताना त्यावर उपाययोजना न करता करवाढ केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. करवाढीतून मिळणाऱ्या निधीचा वापर कसा केला जाणार, याबाबतही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून या निर्णयामुळे शहरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

# छत्रपती शिवरायांच्या मंदिराने पर्यटनाला चालना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात मागील वर्षी उभारण्यात आलेले महाराष्ट्रातील पहिले छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर आज केवळ राज्यापुरते मर्यादित न राहता देश -विदेशातील पर्यटकांचेही प्रमुख आकर्षण ठरत आहे. मराडे पाडा परिसरात उभारण्यात आलेल्या या मंदिराला विविध जिल्ह्यांतील नागरिक, शालेय सहली तसेच इतिहासप्रेमी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. विशेष म्हणजे आता विदेशी पर्यटकांनाही शिवरायांच्या विचारांची आणि पराक्रमाची भूरळ पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार, धोरणे, पराक्रम आणि दैदिप्यमान इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने भिवंडी येथे या भव्य मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. राज्यातील हे पहिलेच शिवमंदिर असल्याचे मानले जात असून स्वराज्य, धर्मनिष्ठा, सुशासन आणि लोककल्याण या मूल्यांचा वारसा जपण्याचे कार्य येथे केले जात आहे. महाराष्ट्रात शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शिवरायांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रम राबवले जातात. तसेच शिवजयंतीनिमित्त गुरूवारी भिवंडीतील मंदिरात भव्य आणि भक्तिभावपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवक्रांती प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांची सुरुवात पहाटे अभिषेक आणि विधीवत पूजेने झाली. यानंतर रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, डोळे तपासणी अशा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

# मध्य रेल्वेच्या प्रवासीसंख्येत वाढ ● १३७ कोटींहून अधिक प्रवासी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ भिवंडी (प्रतिनिधी)**

**मुंबई** : मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हणून लोकल ओळखली जाते. वेगवान, स्वस्त सेवेमुळे मुंबईकर मोठ्या संख्येने लोकलचा वापर करीत आहेत. मध्य रेल्वेतून दररोज ४० लाख प्रवासी प्रवास करतात. त्यानुसार जानेवारी २०२६ मध्ये १२.७ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. तर, मध्य रेल्वेच्या लोकल आणि लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांमधून एप्रिल ते जानेवारीदरम्यान सुमारे १३७ कोटी प्रवाशांनी प्रवास केला.

मध्य रेल्वेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात (जानेवारी २०२६ पर्यंत) प्रवासी वाहतुकीत उल्लेखनीय वाढ झाल्याची नोंद झाली आहे. ज्यामध्ये लोकल सेवा आणि लांब पल्ल्याच्या रेल्वेसेवा या दोन्ही विभागांमध्ये स्थिर वाढ नोंदवली आहे. मध्य रेल्वेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात एकूण १३७ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. गेल्या वर्षी याच कालावधीत १३४ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला होता. यावर्षी सुमारे १.८६ टक्के अधिक प्रवाशांनी प्रवास केला. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये लोकलमधून १२० कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. तर, गेल्यावर्षी ११८ प्रवाशांनी प्रवास केला. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मेल / एक्सप्रेस / पॅसेंजर आणि इतर उपनगरीय गाड्यांमधून १७ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. तर, गेल्यावर्षी १६ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला.

जानेवारी २०२६ मध्ये मध्य रेल्वेतून १४ कोटीहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला. त्यापैकी १२ कोटीहून अधिक प्रवाशांनी लोकल आणि १.७ कोटी प्रवाशांनी लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांमधून प्रवाशांनी प्रवास केला. नेरुळ / बेलापूर उरण विभागात अतिरिक्त सेवा सुरू केल्यानंतर आणि या मार्गावर तारघर आणि गव्हाण स्थानकांचे लोकार्पण केल्यानंतर प्रवाशांच्या संख्येत काहीशी वाढ झाली.



# एसटी कर्मचाऱ्यांचे ‘बोंब मारो’ आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई** : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने निधीच्या मागणीसाठी राज्य सरकारकडे १६ वेळा पत्रव्यवहार केला असून राज्य सरकारच्या परिवहन विभागाकडून अनेक वेळा पत्रव्यवहार केल्यानंतरही अर्थ खात्यातील अधिकारी त्याकडे लक्ष देत नाहीत. अर्थ खात्याचा कार्यभार असलेले राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी लक्ष घालून झोपेचे सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यांची कानउघडणी करावी. अन्यथा २४ फेब्रुवारी रोजी एसटी कर्मचाऱ्यांसह आझाद मैदानात 'बोंब मारो' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस संघटनेने दिला आहे.

एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांना वेतनासोबत या महिन्यात वेतनवाढ फरक हप्ता मिळाला नसून, निधीच्या मागणीचा दस्ताऐवज राज्य सरकारच्या अर्थ खात्यात निर्णयाविना पडून आहे. हप्ता न मिळाल्याने कामगारांमध्ये असंतोष पसरला आहे. यासंदर्भात एसटी महामंडळ, राज्य सरकारच्या परिवहन विभागाने वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा अर्थ खात्यातील अधिकारी या दस्ताऐवजाकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. एसटी महामंडळातील ८६ हजार कर्मचाऱ्यांना या महिन्यात वेतनवाढ फरक रक्कम हप्ता मिळालेला नाही. त्यासाठी एसटीने राज्य सरकारकडे १९२.४६ कोटी रुपयांची मागणी केली. दर महिन्याला सरकारकडून येणाऱ्या सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेसह एकूण ७२५.४६ कोटी रुपये निधीची मागणी केली होती. मात्र केवळ ४०० कोटी रुपये राज्य सरकारकडून देण्यात आल्याने एसटीचे आर्थिक गणित बिघडले. या महिन्यात वेतनवाढ फरकाची वाढीव रक्कम कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली नाही. याला निव्वळ राज्य सरकारचे अर्थ खात्यातील अधिकारी जबाबदार असून उर्वरित रक्कम येत्या सोमवारपर्यंत न मिळाल्यास मंगळवारपासून कर्मचाऱ्यांचा आक्रोश व असंतोष आंदोलनातून दिसून येईल, असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी सांगितले.

**■ राज्य शासनाचे एसटी महामंडळाला पत्र**

**महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्यावतीने २४ फेब्रुवारी रोजी वित्त खात्यातील अधिकाऱ्यांच्या विरोधात आझाद मैदानात 'बोंब मारो' आंदोलन करण्यात येणार आहे. परिवहन विभागाचे प्रमुख म्हणून ही बाब वित्त खात्यातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. अन्यथा नाइलाजास्तव हे आंदोलन झाल्यास त्याची जबाबदारी शासनाच्या अर्थ खात्याची राहील, असे संघटनेकडून सांगण्यात आले. तरी, 'बोंब मारो' आंदोलनासंबंधी तत्काळ योग्य ती कारवाई करून त्यांना आंदोलन करण्यापासून परावृत्त करावे, असे पत्र राज्य शासनाच्यावतीने एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांना पाठवले आहे.**

# दहागाव येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**शहापूर ग्रामीण**
**●नरेंद्र पाटील**

वासिंद जवळील दहागाव येथे ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुरुष अ गट व ब गट यांसाठी भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक 21 फेब्रुवारी 2026 रोजी सायंकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. वासिंद जवळ असलेले दहागाव गाव म्हणजे कबड्डी क्षेत्रात अनेक वर्षापासून एक नाव कमावलेले गाव आहे अनेक वर्षापासून या गावांमध्ये कबड्डी स्पर्धांचे आयोजन केले जाते यावर्षी शनिवार दिनांक 21 फेब्रुवारी 2026 रोजी भव्य अशा जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा पुरुष अ व ब गटातील स्पर्धा संपन्न होणार असून या स्पर्धेचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे तसेच रविवार दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी ठाणे जिल्हा परिषद सदस्य देवेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ होणार आहे या उद्घाटन सोहळ्यासाठी शहापूर विधानसभेचे माजी आमदार पांडुरंग बरोरा, भाजपाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी व विविध पक्षांचे राजकीय पदाधिकारी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत तसेच बक्षीस वितरण सोहळ्यासाठी शहापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार दौलत दरोडा, भिवंडी पूर्वचे माजी आमदार रुपेश म्हात्रे,मारुती धिर्डे, उद्योजक अनिलजी मानिवडे, शिवाजी अधिकारी, वासिंदचे सरपंच राजेंद्र म्हसकर, भोलानाथ कंपनीचे मॅनेजर संजय शिरगावकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी या आयोजित केलेल्या भव्य अशा जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांसाठी जिल्ह्यातील कबड्डी संघाने आपला सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजक राजदीप जामदार, सुधीर देसले, मनोज मोरे, नकुल परटोले, अतुल देसले सह जय बजरंग क्रीडा मंडळ, शिव प्रेरणा क्रीडा मंडळ, दत्त सेवा मंडळ व आई गावदेवी मंडळ दहागाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डोंबिवली दावडी गाव हद्दीत बेकायदा चाळी जमीनदोस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - डोंबिवली जवळील दावडी गाव हद्दीत एका गृहसंकुलाच्या मागील भागात भूमाफियांनी गेल्या महिनाभराच्या कालावधीत बेकायदा चाळींची उभारणी केली होती. या बेकायदा चाळींची माहिती मिळताच आय प्रभागाच्या तोडकाम पथकाने या बेकायदा चाळी गुरुवारी जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केल्या. या बेकायदा चाळी जमीनदोस्त केल्याने परिसरातील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले. कल्याण शिळफाटा रस्त्यालगतच्या दावडी गाव हद्दीत रिजन्सी गृहसंकुला जवळील मागील भागात मोकळ्या रानावर भूमाफियांनी गेल्या महिनाभराच्या कालावधीत रात्रंदिवस काम करून बेकायदा चाळी उभारल्या. डोंबिवली शहरातील, रिजन्सी संकुल, रिजन्सी अनंतम आणि परिसरातील गृहसंकुलातील अनेक रहिवासी दररोज सकाळी, संध्याकाळी रिजन्सी संकुला पाठीमागील भागातील डोंगरांवर वनराईत फिरण्यासाठी जातात. पहाटेपासून नागरिकांची या डोंगर भागात, मोकळ्या माळ रानावर फिरण्यासाठी वर्दळ असते. डोंबिवलीतील हा प्रशस्त निसर्गरम्य भाग वनराईने बहरलेला आहे. मागील काही दिवसांपासून नागरिकांना फिरण्याच्या मार्गात मोकळ्या माळरानावर भूमाफियांनी रात्रंदिवस काम करून या भागातील काही झाडे तोडून बेकायदा चाळी उभारल्या होत्या.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY


7038658191
9130580111

ठाणे ■ शुक्रवार
२० फेब्रुवारी २०२६
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# डोंबिवलीत रविवारी जगद्गुरुंच्या सिद्ध पादुकांचे दिव्य दर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** हिंदू धर्मसंस्कृतीत पादुका पूजन व दर्शनाची परंपरा अत्यंत पवित्र मानली जाते. गुरु–शिष्य परंपरेतून आलेल्या या परंपरेतून भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला जातो. याच भक्तीभावातून जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी यांच्या दिव्य सिद्ध पादुकांच्या दर्शन सोहळ्याचे भव्य आयोजन रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता डोंबिवली पूर्व येथील चंद्रेश नीलकंठ बिल्डिंग मागील मैदान, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लोढा हेवन, निळजे, कल्याण–शिळ रोड येथे करण्यात आले आहे. रामानंद संप्रदाय – जिल्हा दक्षिण ठाणे भक्त सेवा मंडळाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात धार्मिकतेसोबत सामाजिक बांधिलकीही जपली जाणार आहे. या अंतर्गत ३० गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात येणार असून, शिक्षणासाठी दूर अंतर पायी चालत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. ‘तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा’ या अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणादायी संदेशातून या उपक्रमाची संकल्पना साकार झाली आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत ज.न.म. संस्थानामार्फत जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना सायकल वितरण होणार आहे.

### शाळेतील ३० गरजू विद्यार्थ्यांना सायकल ;शेकडो अनुयायांना उपासक दीक्षा

# आनंद बाजार शिकवतो व्यवहारिक शिक्षणाची परिभाषा

## सरपंच साक्षी साठे ह्यांचे प्रतिपादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**वाडा :** जिल्हा परिषद शाळा साठेपाडा येथे विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या उत्तम नियोजनातून शाळेच्या प्रांगणात बुधवारी "चिमुकल्या विध्यार्थ्यांचा आनंद महोत्सव अर्थात आनंद बाजाराचे" आयोजन करण्यात आले होते. ह्याचे उद्घाटन आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. साक्षी साठे यांच्या उपस्थितीत पार पडले. प्रसंगी त्यांनी छोट्या व्यवसायिक विद्यार्थी वर्गाला शुभेच्छा देऊन प्रोत्साहित केले. जि. प. शाळांच्या माध्यमातून अनेक नवोपक्रम राबवले जातात त्यापैकीच जि. प. शाळा साठेपाडा या ठिकाणी शाळेच्या मुख्याध्यापिका रत्ना पाटील, सहकारी शिक्षिका ज्योत्स्ना पाटील व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील बरफ आणि त्यांच्या कार्यकारिणीने बालगोपालांना व्यवहारिक शिक्षणाची पाया भरणी व्हावी, तसेच त्यांच्यामध्ये व्यवहारिक मूल्य वृद्धिंगत होण्याहेतु या आनंदबाजार संकल्पनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून साठेपाडा व परिसरातील ग्राहकांना खरेदीची संधी देतानाच लहानग्यांनी लावलेल्या दुकानात परिसरातील नैसर्गिक वस्तू, रानमेवा तसेच ऑरगॅनिक भाज्या, फळे, फुलांचे गजरे यांची विक्री करून समाजाला एक चांगला संदेश देण्याचा प्रयत्न केला. बाजारात साठेपाड्यातील "रमेश मित्र मंडळाच्या" तरुणाई सोबत गावकर्यांनी पदरमोड करून उत्तम दुकानदारासोबतच उत्तम ग्राहक म्हणून भूमिका बजावून विध्यार्थ्यांना उद्याचा व्यवहारिक नागरिक बनण्यासाठी प्रोत्साहन दिले.

# आरएसएस मानहानी याचिकेवर राहुल गांधी भिवंडी कोर्टात?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**राहुल गांधी न्यायालयात येत असल्याची माहिती त्यांचे वकील अँड.नारायण अय्यर यांनी दिली आहे.या प्रकरणात राजेश कुंटे यांची सरतपासणी आणि उलटतपणी झालेली आहे.**

**भिवंडी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) संघटनेची बदनामी मानहानी केल्या प्रकरणी भिवंडी न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणी साठी लोकसभा विरोधीपक्ष नेते राहुल गांधी शनिवार (२१) रोजी भिवंडी न्यायालयात हजर होणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली. त्यामुळे त्यांच्या सुरक्षितता दृष्टीने पोलिसांनी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्याची तयार सुरू केली आहे.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकी काळात भिवंडी तालुक्यातील सोनाळे येथे आयोजित प्रचार सभेत कॉंग्रेस नेते खा.राहुल गांधी यांनी महात्मा गांधी हत्येमागे आरएसएस या संघटनेचा हात असल्याचे विधान केले होते.त्याविरोधात भिवंडी आरएसएस संघटनेचे पदाधिकारी राजेश कुंटे यांनी भिवंडी न्यायालयात आरएसएस संघटनेची बदनामी झाल्याबद्दल भा.दं.सं.कलम ५०० प्रमाणे खाजगी फिर्याद दाखल केली होती.या प्रकरणात खा.राहुल गांधी यांनी दिलेले जामीनदार माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाल्याने न्यायालयात नवीन जामीनदार सादर करण्यात येणार आहे.त्यासाठी राहुल गांधी न्यायालयात येत असल्याची माहिती त्यांचे वकील अँड. नारायण अय्यर यांनी दिली आहे.या प्रकरणात राजेश कुंटे यांची सरतपासणी आणि उलटतपणी झालेली आहे.तर या प्रकरणची चौकशी करणारे पोलीस अधिकारी सायकर यांची सरतपासणी नोंदविलेली आहे असे शेवटी अँड. नारायण अय्यर यांनी स्पष्ट केले आहे.

# रमजान कालावधीत तात्पुरता स्टॉल परवनागी प्रभाग समिती कार्यालय मार्फत देण्यात येणार - मा आयुक्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रांतील सर्व व्यावसायिक व नागरीकांना आवाहन करण्यांत येते कि, दिनांक १९/०२/२०२६ ते दिनांक २१/०३/२०२६ पर्यंत रमजान सण असून सदर कालावधीत तात्पुरते स्टॉल परवानगी प्रभाग समिती कार्यालया मार्फत देण्यांत येणार आहेत. त्यासाठी खालील प्रमाणे काही अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत.

रमजान काळात स्वच्छता राखणेकामी इफ्तारीनंतर होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे, कचरा डब्बे वाढवणे, दररोज झाडू मारणे, डीप क्लिनिंग करणे आणि स्वच्छता राखण्यासाठी रेस्टॉरंट / हॉटेल धारकांशी सूचित करण्यात आले असून तसेच दिवसातून दोन वेळा कचऱ्याचे डब्बे क्लिन करणे, रमजान ईद करीता तात्पुरता स्टॉल परवाना मनपाने निश्चित केलेल्या जागेवरच लावावे, स्टॉलमध्ये पुरेशी आग प्रतिबंध उपाययोजना करुन ठेवावी, प्रत्येक स्टॉल धारकाने कच-यासाठी डब्बा ठेवणे बंधनकारक आहे. स्टॉल समोर कचरा पडणार नाही याची दक्षता स्टॉल धारकांने घेणे बंधनकारक आहे, प्लॉस्टिक पिशव्यांचा वापर टाळावा व आग प्रतिबंध उपकरणं हि ठेवावी.

वाहतूक विभागामार्फत रमजानच्या काळात रहदारीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. नागरीकांना दिसेल अशा ठिकाणी धुम्रपान निषेध मजकुराची पाटी लावावी जेणेकरून सदर ठिकाणी काही अनुसुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यांची संपूर्ण जवाबदारी आपल्यावर राहील. सदर जागेबाबत काही वादविवाद निर्माण झाल्यास तात्पुरता स्टॉल परवाना रद्द करण्यांत येईल.

रमजान सण शांततेत व स्वच्छतेने होणे साठी मनपास सहकार्य करावे असे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका च्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले.

# साई चौक, सह्याद्री नगर ते कल्याण स्टेशन केडीएमटी बस सेवा सुरु



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमांतर्गत बराच काळ बंद असलेली मार्ग क्र.३ साई चौक-सह्याद्री नगर-कल्याण स्टेशन बससेवा परिवहन कामगार कर्मचारी संघटना अध्यक्ष तथा शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आजपासून नागरिकांच्या सेवेत पुन्हा सुरू झाली आहे. आज गुरुवारी सकाळी खडकपाडा साई चौक येथे या बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला. जेष्ठ नागरिकांच्याहस्ते नारळ फोडून या बसला भगवा झेंडा दाखविण्यात आला.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, उपशहर प्रमुख सुनील वायले, नगरसेवक किरण भांगले, रुपेश सकपाळ, नगरसेविका शालिनी वायले, प्रमिला पाटील, तनुजा वायले, युवासेना कल्याण उपशहर प्रमुख अनिरुद्ध पाटील, प्रथमेश पाटील आदी पदाधिकारी, जेष्ठ नागरिक, महिला, स्थानिक नागरिक, परिवहन सेवेचे अधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साई चौक, सह्याद्री नगर ते कल्याण पश्चिम रेल्वे स्टेशन हे अंतर 4 किलोमीटर असून या मार्गासाठी नागरिकांना 25 ते 30 रुपये भाडं रिक्षाला मोजावे लागत होते. मात्र आता केडीएमटीच्या बससेवेमुळे नागरिकांना अवघ्या 10 रुपयांत स्टेशनपर्यंत जाता येणार आहे.

नागरिकांच्या मागणीनुसार आणि शिवसेनेच्या पाठपुराव्याने हि बससेवा पुन्हा सुरु करण्यात आली असून या बसचा मार्ग साई चौक-साईबाबा मंदिर-ब वार्ड-संघवी इस्टेट-इंदिरा बंगला-आरटीओ-सह्याद्री नगर-कोकण वसाहत-सह्याद्री नगर फाटा-बिर्ला कॉलेज-इंदिरा नगर-भवानी चौक,प्रेम ऑटो-पौर्णिमा चौक-सिंडिकेट-स्टेट बँक-बाईचा पुतळा-रामबाग-कल्याण स्टेशन या महत्त्वाच्या ठिकाणांमार्गे धावणार असल्याची माहिती शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी दिली.

# सर्वधर्मसमभाव ही शिवाजी महाराजांची शिकवण कॉंग्रेस पक्ष पुढे नेत आहे – राजकुमार पातकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



### कल्याणमध्ये कॉंग्रेसच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**कल्याण :** छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन सुराज्य निर्माण केलं. त्यामुळे शिवाजी महाराजांची सर्वधर्मसमभाव हि शिकवण कॉंग्रेस पक्ष पुढे नेत असल्याचे मत कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजकुमार पातकर यांनी व्यक्त केले. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, रयतेचे राजे, श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'कल्याण डोंबिवली शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी' तर्फे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कार्यालयात करण्यात आले यावेळी पातकर बोलत होते.

शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पाहार अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाला कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष राजकुमार पातकर यांच्यासह राजेश वाघमारे, मामा पगारे, सलीम शेख, गोपाळ शर्मा, दशरथ पाटील, अरुण वायले, हाफिज कुरेशी, संकेत लोके, अमोल गायकवाड, शामराव यादव, सुजित सिंह, चंद्रकांत पगारे, हरिश्चंद्र पाटील, जयराज पवार, वैशाली वाघ, किशोर वाघ आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलतांना पातकर यांनी सांगितले कि, शिवाजी महाराज शौर्याचे प्रतीक होते. शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती नेहमी होत असते. वर्षाचे 365 दिवस जरी जयंती साजरी केली तरी कमी आहे कारण त्यांचं कार्य तेवढं मोठं आहे. त्यांची जयंती साजरी करणे आपले आद्य कर्तव्य आहे. कल्याणच्या सुभेदारांच्या सुनेचा सन्मान करून स्त्रियांचा आदर करण्याचे शिवाजी महाराजांनी शिकवले. कॉंग्रेस पक्ष सर्वधर्मसमभाव ही शिवाजी महाराज यांची शिकवण पुढे नेत असल्याचे पातकर यांनी सांगितले.

# मिलापनगर मध्ये बंगल्यात दरोडा टाकण्याचा प्रयत्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



### दरोडेखोर सीसीटिव्ही कॅमेरात कैद

**कल्याण :** डोंबिवली एमआयडीसी, मिलापनगर हा विशेष करून बंगल्यांचा परिसर असून कारखानदार, डॉक्टर, सीए, वकील, शासकीय, खाजगी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी इत्यादी उच्चभ्रू लोकांची वस्ती येथे आहे. याठिकाणी एका बंगल्यात दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला असून हे दरोडेखोर सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहेत.

महाशिवरात्री दिवशी दिनांक 15 फेब्रुवारी रोजी रात्री अडीच वाजता दरम्यान मिलापनगर, एमआयडीसी मधील अभिनव सहकारी बँकेच्या समोरील एका बंगल्यात एक वृद्ध स्त्री घरात एकटीच असताना बंगल्याचे खिडकीचे ग्रील तोडून तीन दरोडेखोरांनी बंगल्यात प्रवेश केला. त्यापूर्वी एका दरोडेखोराने त्याच रात्री 1.25 वाजता या बंगल्यात रेकी करून गेल्याचे सीसी कॅमेरात दिसत आहे. दरोडेखोरांचा हातात कोयते व इतर हत्यारे होती. बंगल्यात कोणीतरी असल्याचे व सदर वृद्ध स्त्री जागी झाल्याचे समजताच त्या तीन दरोडेखोरांनी भागो बोलत पलायन केले.

यानंतर त्या वृद्ध स्त्रीने शेजारी राहणाऱ्यांना फोन करून माहिती दिली असता त्यानी मदतीसाठी प्रत्यक्ष येऊन पोलिसांना कळविले. काहीवेळातच मानपाडा पोलीस घटनास्थळी येऊन त्यानी चौकशी करून दरोडेखोरांना पकडण्यासाठी एक पथक रवाना केले. परंतु दरोडेखोर तोपर्यंत पसार झाल्याने मानपाडा पोलीस या दरोडेखोरांना पकडण्यासाठी सीसी कॅमेराद्वारे त्यांचा तपास करीत आहेत.यापूर्वीही मिलापनगर परिसरात अशा घरफोड्या झाल्या असल्याने येथील रहिवाशांत घबराट पसरली असून रात्री/पहाटे पोलीस गस्ती वाढवावी आणि या दरोडेखोरांना जेरबंद करावे अशी मागणी मिलापनगर रेसिडेन्ट्स वेलफेअर असोसिएशनने पत्राद्वारे केली आहे.

# कापरी फेस्टिवल पर्व सातचे दिमाखदार आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत कापरी, तालुका वाडा येथे कापरी फेस्टिवल पर्व सातचे दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन बिलघर ग्रामपंचायत चे विद्यमान सरपंच तथा कापरी गावचे सुपुत्र श्री मोतीराम नडगे यांच्या शुभहस्ते प्रतिमांचे पूजन व श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी मागील अनेक वर्ष ज्यांनी कापरी गावातील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना चांगल्या प्रकारे ज्ञानदानाचे कार्य करून उत्तम संस्कार घडवले तथा सर्वगुणसंपन्न करण्यास खूप चांगल्या प्रकारे सहकार्य केले असे संतोष जाधव आणि उमेश भोईर तसेच नव्याने रुजू झालेले शाळेचे मुख्याध्यापक संपत शेडगे यांचा सत्कार करण्यात आला. फेस्टिवल मध्ये जिल्हा परिषद शाळेतील तसेच कापरी गावातील बाल कलाकारांनी आपले कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा संपूर्ण कार्यक्रमातून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक निवडून त्यांना आकर्षक ट्रॉफीज देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून संतोष जाधव व उमेश भोईर यांनी उत्तम प्रकारे कामगिरी बजावली. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्या प्रमिला राऊत, माजी शिक्षक, ज्येष्ठ व्यक्तिमत्व, महिलावर्ग, तरुण तसेच बालकलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश भोईर यांनी केले तर संपत शेडके यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# पेण तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पेण :** पेण तालुक्यात ठिकठिकाणी आज 19 फेब्रुवारी रोजी शाळा कॉलेज महाविद्यालय त्याचबरोबर नगरपालिका विविध संस्था, विविध तरूण मंडळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने आणि आनंदमय वातावरणामध्ये साजरी केली.

पेण शहरातील प्रायव्हेट हायस्कूल कन्याशाळा ,सार्वजनिक विद्यामंदिर, सुमतीबाई देव आणि पेण एज्युकेशन ची प्राथमिक शाळा नगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांनी “जय भवानी, जय शिवाजी!” अशा जोशपूर्ण घोषणा दिल्या. काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर सुंदर भाषणेही सादर केली. अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज जिजाबाई छत्रपती संभाजी महाराज यांच्या वेशभूषा सादर करून उत्साह, देशभक्ती आणि प्रेरणादायी वातावरणात शिवजयंती उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. शिवाजी महाराजांच्या जीवनावर जोगवा पोवाडा आणि जोशपूर्ण गीत गायन करून त्याचबरोबर लेझीम पथक दांडपट्टा ढोल ताशा सह काढलेली मिरवणूक पाहता पेण शहरामध्ये एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. पेण नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष प्रीतम पाटील मुख्याधिकारी जीवन पाटील सर्व नगरसेवक नगरसेविका आणि कर्मचारी वर्ग छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करताना उपस्थित होते.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024